**जिल्हा परिषद अमरावती**
**कॅम्प़ रोड, जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ अमरावती ४४४ ०२**
**दूरध्वनी कमांक - ०७२१ २६६२९२६**
ईमेल - ceozp.amravati@maharashtra.gov.in
Websit- www.zpamravati.gov.in

क्रमांक : जिप/मुकाअ/स्विस/२०१७/८९२ दिनांक : २२ मार्च, २०१७

**पंचायत समिती स्तरावरील प्रलंबित प्रकरणे सादर करण्यात विलंब करण्या-या अधिकारी/कर्मचा-यांवर प्रशासकीय कारवाई करणेबाबत..**

## परिपत्रक

जिल्हा परिषदेकडील विविध कार्यालयप्रमुखांकडून त्यांचे विभागाकडील प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेतना असे निदर्शनास आलेले आहे की, बहुतांश प्रकरणे तालुकास्तरीय यंत्रणेकडून चौकशी अहवाल अप्राप्त असल्याने जिल्हास्तऱावर प्रकरणे निकाली काढण्यास विलंब होत आहे. जिल्हा कार्यालयाकडून काही प्रकरणे तालुकास्तरावर माहिती प्राप्त़ करुन घेणेसाठी अथवा अहवाल प्राप्त़ करुन घेणे पाठविली असता विहित मुदतीत अहवाल सादर होत नाही. त्यामुळे सदर प्रकरणावर निर्णय घेण्यास अडचण निर्मात होत असते. कार्यालयप्रमुखांकडून माहिती घेतली असता गट विकास अधिकारी, गट शिक्षणाधिकारी, उपविभागीय अभियंता इ. यांचेकडून माहिती/अहवाल सादर न झाल्याने प्रकरण निर्णयासाठी मुख्य़ कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर होवू शकत नसल्याची बाब कार्यालय प्रमुखांकडून निदर्शनास आणून देण्यात आलेली आहे.

आता याव्दारे असे कळविण्यात येत आहे की, तालुकास्त़रावरील प्रलंबित प्रकरणांमुळे अहवाल सादर करण्यासास विलंब झाल्याचे मत असल्यास तसे टिपणीवर सकारण नमुद करुन प्रथम संबंधित अधिकारी कर्मचारी यांचेविरुध्द प्रशासकीय कारवाईसाठी जबाबदारी निश्चित करावी आणि त्यानंतर प्रकरणे विहीत मुदतीच निर्णयासाठी सादर करावे.

KSK

**(डॉ. किरण कुलकर्णी, भाप्रसे)**
**मुख्य़ कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अमरावती**

प्रतिलिपी-

१. अतिरिक्त़ मुख्य़ कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांना माहितीस्तव़ अग्रेषित.
२. सर्व कार्यालय प्रमुख, जिल्हा परिषद अमरावती.
३. तालुका स्तरावरील सर्व कार्यालय, जिल्हा परिषद अमरावती यांना माहितीस्तव़ अग्रेषित.